**"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -२०१५"**

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग,

*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या:* http://wrd.maharashtra.gov.in/

क्र:- ई प्रशा२०१५/३९८/१५/लपा-१

हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई.३२.
दिनांक: २९/१०/2015

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)
सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)

| | |
|---|---|
| विषय:- | **जलसंपदा विभागातील मंजुर पदे व कार्यरत पदे यांचा आढावा घेण्यासाठी सर्व कार्यालयांचा आकृतीबंध ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये नोंदविणेबाबत करावयाची कार्यवाही.** |
| संदर्भ: | जलसंपदा विभाग शासन निर्णय प्रशा २०१४ / (२५१/१४) / लपा-१, दि. ११/११/२०१४ |

उपरोक्त शासन निर्णयाअन्वये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे करिता ई सेवा पुस्तक ही प्रणाली अनिवार्य केली असुन सदर प्रणाली टप्प्याटप्प्याने कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये जलसंपदा विभागातील कार्यालयांची नोंदणी संबंधितांनी केली असुन, त्यांचे मार्फत त्यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये Registration करण्यात आले आहे. तसेच माहिती भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आठ मोडयुल्स मध्ये माहिती भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रणालीमधील उर्वरीत मोड्युल्स देखील लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

सद्यस्थितीत जलसंपदा विभागातील मंजुर पदे व कार्यरत पदे यांचा आढावा घेण्याचे काम शासनस्तरावर सुरु आहे. याबाबतची माहिती ई-सेवा पुस्तक प्रणालीमधुन उपलब्ध व्हावी यासाठी प्रणाली विकसनाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. या अंतर्गत ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये प्रत्येक कार्यालयाचा आकृतिबंध तयार करुन त्यानुसार कार्यरत पदे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. **या अनुषंगाने अधीक्षक अभियंता कार्यालयातील संबंधित उप/ सहायक अधीक्षक अभियंता यांना मंडळ कार्यालय तसेच त्यांच्या अंतर्गत कार्यरत सर्व कार्यालयांचा (जसे- विभाग, उप-विभाग, सिंचन शाखा इत्यादी) चा आकृतिबंधानुसार माहे ऑक्टोंबर २०१५ अखेरची कार्यरत पदे भरण्याची जबाबदारी देण्यात येत आहे. त्यांनी त्यांचे व त्यांचे अंतर्गत असलेल्या सर्व कार्यालयांची संबंधित माहिती प्रणालीमध्ये अचुकपणे भरणे आवश्यक असुन यामध्ये कोणतीही चुक झाल्यास त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाईल.**

**तसेच सर्व महामंडळ, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक व सर्व मुख्य अभियंता यांचे स्वत:चे कार्यालयातील मंजुर पदे व कार्यरत पदे यांची माहिती**

भरण्यासाठी संबंधित कार्यालयप्रमुखांनी उप-अभियंता पदावरील एका अभियंत्याची व एका लिपिकाची नेमणुक करावी व त्यांना या पत्राचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश द्यावेत.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १, २ व ३ नुसार प्रत्येक कार्यालय (उदा: मंडळ/ विभाग/ उपविभाग/सिंचन शाखा इ.) यांचेबाबत आवश्यक ती माहिती संबंधित उप/ सहायक अधीक्षक अभियंता यांनी तयार करावी. सदर माहिती दि. २ नोव्हेंबर २०१५ पुर्वी ae1trg.pmo@gmail.com या ई-मेल वर पाठविणे अत्यावश्यक आहे. तसेच महामंडळ व प्रादेशिक कार्यालयांची माहिती संबंधितांनी पाठवावी.

सदर माहिती प्रणालीमध्ये भरुन त्याची पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथे दि. १८-१९ नोव्हेंबर २०१५ व २०-२१ नोव्हेंबर २०१५ या कालावधीमध्ये कार्यशाळा घेण्यात येणार आहे. संबंधित उप/ सहायक अधीक्षक अभियंता व मंडळ कार्यालयातील संबंधित लिपिक यांनी या कार्यशाळेत प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. याबाबतचे वेळापत्रक कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेकडुन निर्गमित केले जाईल. सदर माहिती शासनास तात्काळ आवश्यक असल्याने कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे वेळापत्रकानुसार संबंधितांनी उपस्थित राहुन माहिती भरणे आवश्यक आहे. याअनुषंगाने क्षेत्रीय अधीक्षक अभियंता यांनी योग्य ती काळजी घ्यावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये माहिती भरण्याचे राहुन जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, अन्यथा अशा कार्यालयातील कार्यरत पदे विचारात घेतली जाणार नाही, व त्यामुळे भविष्यात अशा अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनाचा व सेवेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्याची जबाबदारी संबंधित अधीक्षक अभियंता यांची राहील.

ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये आकृतीबंध तयार करण्यासाठी करावयाची पुर्वतयारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्याकरिता ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयामार्फत दिनांक ०५/११/२०१५ व ०६/११/२०१५ रोजी परिशिष्ट क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे Video Conference चे नियोजन करण्यात येत आहे. जलसंपदा विभागातील सर्व कार्यालय प्रमुखांना या पत्रान्वये निर्देशित करण्यात येते की, परीशिष्ट क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार त्यांचे कार्यालयामधील संबंधित अधिकारी (उदा- महामंडळ कार्यालयातील संबंधित कार्यकारी अभियंता, प्रादेशिक कार्यालयातील सहायक मुख्य अभियंता व मंडळ कार्यालयातील उप/सहायक अधीक्षक अभियंता, यांचेसह सर्व कार्यालयातील संबंधित काम पहाणारे लिपिक यांनी) Video Conference साठी उपस्थित राहण्याबाबत आदेशित करावे. तसेच विभागिय कार्यालयातील उप-कार्यकारी अभियंता व संबंधित लिपिक यांनी त्यांचे कार्यालयाचे नजिक असलेल्या VC च्या ठिकाणी उपस्थित रहावे व त्याबाबत त्यांचे मंडळ कार्यालयास अवगत करावे. खाली दर्शविल्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणी VC ची जोडणी करणे शक्य होणार नाही. तसेच VC पुनश्च देखील घेण्यात येणार नाही.

भविष्यामध्ये सेवा विषयक विविध बाबी ई-सेवा पुस्तक प्रणालीमधुन पार पाडण्याचे प्रस्तावित आहे. या प्रणालीमधील माहितीचे एकत्रिकरणाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सेवाविषयक बाबी जसे-पदोन्नती, जेष्ठता सुची, वेतन, वेतनवाढ, गोपनीय अहवाल, प्रशिक्षण, बदली, निवृत्ती, इ. विषयक बाबी जलदगतीने पार पाडणे शक्य होणार आहे. या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही करुन, सदर प्रणाली यशस्वी होईल याकडे वैयक्तिकरित्या लक्ष घालावे.

डॉ. संजय बेलसरे
शासनाचे उपसचिव

सहपत्र:-

१) परिशिष्ट-१ - कार्यालयांच्या रचनेची माहिती
२) पारिशिष्ट-२ - कार्यालयाचा आकृतीबंध
३) परिशिष्ट-३ - मंजुर आकृतीबंधानुसार कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची यांची माहिती
४) परिशिष्ट-४ (अ ते ड) - VC चे वेळापत्रक

प्रत:

१) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांनी याबाबत सर्व संबंधिताना email/SMS द्वारे अवगत करुन याबाबतचा पत्रव्यवहार संकेतस्थळावर अपलोड करावा.
२) सह-सचिव, सेवा: याबाबतचा आढावा घेऊन सचिव, लाक्षेवि यांना अहवाल सादर करावा.
३) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक: दि. १८ ते २१ नोव्हेंबर २०१५ या कालावधीमध्ये "ई-सेवा पुस्तक आकृतीबंध कार्यशाळा" कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे सहकार्याने आयोजित करावी व त्यास उपस्थित राहणाऱ्या (दर दिवशी १०० अधिकारी) प्रशिक्षणार्थींकरिता संगणक, इंटरनेट, भोजन, निवास आदी व्यवस्था करण्यात यावी.

# परिशिष्ट-१ - कार्यालयांच्या रचनेची माहिती

मंडळाचे नाव:

________________________________________

विभागाचे नाव:

________________________________________

विभागाचा कार्यप्रकार (लागु असलेला निवडावा): Construction / Management / Design / Quality Control / Survey & Investigation/ Research / Training / Hydrology / Vigilance

टिप:

१) प्रत्येक विभागिय कार्यालयाचे सर्व उप-विभाग व सिंचन शाखा यांची माहिती स्वतंत्रपणे भरण्यात यावी. आवश्यकता भासल्यास अतिरिक्त पाने जोडावीत.

२) कार्यालयांची माहिती भरताना विभाग व त्या अंतर्गत असलेले उप-विभाग व त्या उप-विभागांच्या अंतर्गत असलेल्या सिंचन शाखा एका खाली एक येतील अशा पध्दतीने भराव्यात. (खालील तक्तानुसार)

३) सदर माहिती केवळ English मध्ये तयार करुन Excel मध्ये भरण्यात यावी व ती माहिती दि. २/११/२०१५ पर्यंत aeltrg.pmo@gmail.com या ई-मेलवर पाठवावी. कृपया हार्ड कॉपी पाठविण्यात येऊ नये.

| Name of Office | Village | Tahsil | District |
|---|---|---|---|
| **Sub Division No-1** | | | |
| Section 1.1 | | | |
| Section 1.2 | | | |
| Section 1.3 | | | |
| Section 1.4 | | | |
| Section 1.5 | | | |
| | | | |
| **Sub Division No-2** | | | |
| Section 2.1 | | | |
| Section 2.2 | | | |
| Section 2.3 | | | |
| Section 2.4 | | | |
| Section 2.5 | | | |

# पारिशिष्ट-२ - कार्यालयाचा आकृतीबंध

टिप:

१) खालील माहिती भरताना शासनाकडुन मान्यता मिळालेल्या सेवासातत्य / मुदतवाढ / आकृतीबंध प्रस्तावानुसारच भरणे आवश्यक आहे. सर्व मंजुर पदांची माहिती यामध्ये भरणे आवश्यक आहे.

२) मंडळ कार्यालय ते सिंचन शाखा या प्रत्येक कार्यालयासाठी स्वतंत्रपणे आकृतीबंध खालीलप्रमाणे तयार करण्यात यावा.

३) सदर माहिती केवळ English मध्ये तयार करून Excel मध्ये भरण्यात यावी व ती माहिती दि. २/११/२०१५ पर्यंत aeltrg.pmo@gmail.com या ई-मेलवर पाठवावी. कृपया हार्ड कॉपी पाठविण्यात येऊ नये.

**Name of Office:** ____________________

| **Sr.No.** | **Post Name** | **Number of Posts Approved** | | | | **Number of Filled Post** | | | **Vacant Post** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | As per Akrutibandh or Extension | Post Transfer | | Total Post | As per Akrutibandh or Extension | As Per Post Transfer | Total Post | |
| | | | To This Office | From This Office | | | | | |
| **1** | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| etc. | | | | | | | | | |

# परिशिष्ट-३ - मंजुर आकृतीबंधानुसार कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची यांची माहिती

टिप:

१) मंडळ कार्यालय ते सिंचन शाखा या प्रत्येक कार्यालयासाठी स्वतंत्रपणे माहिती तयार करण्यात यावी.

२) सदर माहिती केवळ English मध्ये तयार करून Excel मध्ये भरण्यात यावी व ती माहिती दि. २/११/२०१५ पर्यंत ae1trg.pmo@gmail.com या ई-मेलवर पाठवावी. कृपया हार्ड कॉपी पाठविण्यात येऊ नये.

**Name of Office:** ______________________________

| Sr.No | Aadhar NO* | Honorific* (Dr./Mr./Mrs./Miss.) | First Name* | Middle Name* | Last Name* (Surname) | Post* | Group* (A/B/C/D) | Date Of Birth* | Date Of Joining* | Mobile No.* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | |
| etc. | | | | | | | | | | |

## परिशिष्ट क्र.-४ (अ)

## VC दिनांक व वेळ: दि. ०५/११/२०१५, सकाळी ११:३० ते १२:३० (KIDC + TIDC)

| VC द्वारे जोडण्यात येणारी ठिकाणे | उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित कार्यालये |
|---|---|
| १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे | १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे |
| २) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे | १) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे<br>२) अधीक्षक अभियंता, उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ठाणे<br>३) अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे<br>४) अधीक्षक अभियंता व प्रकल्प संचालक, खारभुमी विकास मंडळ, ठाणे<br>५) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे<br>६) अधीक्षक अभियंता, घाटघर (विवयां) मंडळ, कळवा, ठाणे |
| ३) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे महामंडळ, जळगाव | १) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव<br>२) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव<br>३) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव<br>४) अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव |
| ४) मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई | १) मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई<br>२) मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प (विद्युत), मुंबई |
| ५) दक्षिण कोकण पाटबंधारे मंडळ, ओरस (सिंधुदुर्ग) | १) अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे मंडळ, ओरस (सिंधुदुर्ग) |
| ६) अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी | १) अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी |
| ७) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे | १) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे |
| ८) नवीन प्रशासकीय इमारत, १० वा मजला मंत्रालय मुंबई | १) नवीन प्रशासकीय इमारत, १० वा मजला मंत्रालय मुंबई |

# परिशिष्ट क्र.-४ (ब)

## VC दिनांक व वेळ: दि. ०५/११/२०१५, दुपारी २:३० ते ३:३० (MKVDC)

| VC द्वारे जोडण्यात येणारी ठिकाणे | उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित कार्यालये |
|---|---|
| **१) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे** | १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे<br>२) अधीक्षक अभियंता, कोयना (वि.व यां.) संकल्पचित्र मंडळ, पुणे<br>३) अधीक्षक अभियंता, पाटबधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे<br>४) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे<br>५) अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे<br>६) अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद कक्ष, पुणे |
| **२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ, पुणे** | १) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे<br>२) मुख्य अभियंता, जलसंपदा, पुणे<br>३) मुख्य अभियंता, (वि.प्र.) जलसंपदा, पुणे<br>४) मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प, (स्थापत्य), पुणे<br>५) अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे<br>६) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे<br>७) अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे<br>**(टिप: आवश्यक भासल्यास कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे येथे देखील उपस्थित राहता येईल)** |
| **३) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली** | १) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सांगली<br>२) अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली |
| **४) अधीक्षक अभियंता, कोल्हापुर पाटबंधारे मंडळ, कोल्हापुर** | १) अधीक्षक अभियंता, कोल्हापुर पाटबंधारे मंडळ, कोल्हापुर<br>२) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, कोल्हापुर<br>३) अधीक्षक अभियंता, बांधकाम मंडळ (विद्युत), कोल्हापुर |
| **५) अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा** | १) अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा<br>२) अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा<br>३) अधीक्षक अभियंता, कोयना (विवयां) बांधकाम मंडळ, सातारा |
| **६) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापुर** | १) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापुर<br>२) अधीक्षक अभियंता, भिमा कालवे मंडळ, सोलापुर |
| **७) अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद** | १) अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद |
| **८) अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम** | १) अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम |

# परिशिष्ट क्र.-४ (क)

## VC दिनांक व वेळ: दि. ०६/११/२०१५, सकाळी ११:३० ते १२:३०

## (GMIDC + WALMI + MERI)

| VC द्वारे जोडण्यात येणारी ठिकाणे | उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित कार्यालये |
|---|---|
| १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे | १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे<br>२) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे<br>३) अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे |
| २) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद | १) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद<br>२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>३) मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>४) अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद<br>५) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद<br>६) अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद |
| ३) महासंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद | १) महासंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद<br>२) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद<br>३) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलविकास केंद्र, औरंगाबाद<br>४) अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण, औरंगाबाद<br>५) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद |
| ४) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक | १) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक<br>२) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक<br>३) मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक<br>४) मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक<br>५) मुख्य अभियंता, यांत्रिकी, जलसंपदा विभाग, नाशिक<br>६) मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक<br>७) अधीक्षक अभियंता, आधार सामुग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान, नाशिक<br>८) अधीक्षक अभियंता, आधार सामुग्री पृथ:करण मंडळ, नाशिक<br>९) अधीक्षक अभियंता, (दगडी धरण/माती धरण/द्वारे/उपसा सिंचन) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक<br>१०) अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षा संघटना, नाशिक<br>११) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक<br>१२) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नाशिक<br>१३) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| ५) अधीक्षक अभियंता, लाक्षेवि, अहमदनगर | १) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर |
| ६) अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | १) अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड<br>२) अधीक्षक अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड<br>३) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नांदेड |
| ७) अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (लातुर) | १) अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (लातुर) |
| ८) अधीक्षक अभियंता, लाक्षेवि, बीड | १) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड |

| VC द्वारे जोडण्यात येणारी ठिकाणे | उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित कार्यालये |
|---|---|
| **१) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे** | १) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ पुणे |
| **२) कार्यकारी संचालक, विदर्भ सिंचन विकास महामंडळ, नागपुर** | १) कार्यकारी संचालक, विदर्भ सिंचन विकास महामंडळ, नागपुर<br>२) मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, नागपुर<br>३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपुर<br>४) अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपुर<br>५) अधीक्षक अभियंता, नागपुर पाटबंधारे मंडळ, नागपुर<br>६) अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर<br>७) अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ नागपुर<br>८) अधीक्षक अभियंता, जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, अजनी, नागपुर<br>९) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपुर<br>१०) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नागपुर<br>११) अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, नागपुर |
| **३) मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती** | १) मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती<br>२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती<br>३) अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती<br>४) अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व अन्वेषण मंडळ, अमरावती<br>५) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती |
| **४) अधीक्षक अभियंता, चंद्रपुर पाटबंधारे मंडळ, चंद्रपुर** | १) अधीक्षक अभियंता, चंद्रपुर पाटबंधारे मंडळ, चंद्रपुर |
| **५) अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा)** | १) अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा) |
| **६) अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ** | १) अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ |
| **७) अधीक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा** | १) अधीक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा |
| **८) अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला** | १) अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला |